### या उपचारपद्धतीचे काही दुष्परिणाम (साइड इफेक्ट) आहेत का?

दुष्परिणाम नाहीत, अशी कोणतीही उपचार पद्धती किंवा शस्त्रक्रिया नाही. या उपचारपद्धतीमध्ये

- दृष्टी धुसर होण्याची शक्यता
- दृष्टीतील संवेदना कमी होणे
- बुबुळाच्या पारदर्शक पडद्यावर डाग पडणे
- डोळे कोरडे पडण्याची शक्यता असते

### लेझर उपचारपद्धतीनंतर दृष्टी जाण्याची शक्यता असते का?

विज्ञान आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे या शस्त्रक्रियेतील गुंतागुंत खूप कमी झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रात डोळ्यावर केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांपैकी लेझर व्हिजन करेक्शन ही सुरक्षित शस्त्रक्रिया समजली जाते. लेझर उपचारानंतर दृष्टी जाण्याची शक्यता अगदीच दुर्मिळ असते.

### उपचारपद्धतीमध्ये तांत्रिक अडचणींची शक्यता असते का, एखाद्या शस्त्रक्रियेदरम्यान एखादी तांत्रिक अडचण आली तरी काय करावे लागते?

शस्त्रक्रियेसाठी आम्ही वापरत असलेल्या वैद्यकीय साधनांमध्ये तांत्रिक अडचणी येण्याची अगदीच दुर्मिळ शक्यता आहे. अशी कोणतीही अडचण उद्भवलीच तर आम्ही शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय घेता येऊ शकतो.



### शस्त्रक्रियेसंदर्भातील अधिक माहितीसाठी आमच्या तज्ज्ञांशी संपर्क साधा

- डॉ. आदित्य केळकर
- डॉ. जाई केळकर
- डॉ. वसुंधरा संत
- डॉ. योगेश चौगुले

उपचारांच्या अपॉइंमेंटसाठी
**020 4901 4901** या क्रमांकांवर संपर्क साधावा

Scan QR for Appointment


**NIO Eyes Plus - औंध**
376 सिंध सोसायटी, ब्रेमेन स्क्वेअर,
गणेश खिंड रोड, औंध, पुणे - 411007, महाराष्ट्र

संपर्क: 020 4901 4901

www.nioeyes.com




# नेहमी विचारले जाणारे प्रश्न

NIO EYES+
JAI AND ADITYA KELKAR
EYE CARE AND LASER INSTITUTE PVT. LTD.

# लेझर व्हिजन करेक्शन उपचार पद्धती

## नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**डॉक्टर, मला चष्मा वापरायला आवडत नाही, चष्मा टाळण्यासाठी काही उपाय आहेत का?**


आपल्या आजूबाजूला, समाजात चष्म्याचा नंबर आहे, पण वापरायला आवडत नाही, असे अनेक नागरिक दिसतात. काहींना त्यांच्या व्यक्तिमत्वाला चष्मा साजेसा वाटत नाही, तर काही नागरिक क्रीडा प्रकारात कार्यरत असल्याने त्यांना चष्मा वापरणे शक्य होत नाही, अशा रुग्णांसाठी कॉन्टॅक्ट लेन्स आणि लेझर व्हिजन करेक्शन हे पर्याय उपलब्ध आहेत.


**माझ्यासाठी कोणता पर्याय योग्य ठरू शकतो?**

यासाठी कॉरनिअल टोपोग्राफी आणि पॅकिमेट्री अशा काही आधुनिक वैद्यकीय चाचण्या करुन घ्याव्या लागतात. यातून मिळणारा निष्कर्षांच्या आधारे नेत्रतज्ज्ञ तुम्हाला लेझर करेक्शन शस्त्रक्रिया उपयुक्त ठरू शकते की नाही याबद्दल मार्गदर्शन करतात. या चाचण्याद्वारे तुम्हाला नेमकी कोणती शस्त्रक्रिया योग्य आहे, याचाही अंदाज नेत्रतज्ज्ञांना येतो. जर रुग्ण कॉन्टॅक्ट लेन्स वापरत असतील तर त्यांनी ही वैद्यकीय चाचणी किंवा उपचार पद्धती सुरु करण्यापूर्वी एक आठवडा कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर बंद करणे गरजेचे आहे

**लेझर व्हिजन करेक्शन म्हणजे नेमके काय?**

लेझर व्हिजन करेक्शन म्हणजे डोळ्यांच्या बुबुळाच्या सर्वात पुढच्या पारदर्शक पडद्यावरील (कॉर्निया) शस्त्रक्रिया. सर्वसाधारणपणे लासिक, फेम्टो लासिक, कॉन्टूरा, स्माइल, पीआरके, सरफेस अब्लेशन या प्रकारातील तंत्रज्ञान यासाठी वापरले जाते. डोळ्याच्या बुबुळाच्या पारदर्शक पडद्यावरील समस्या दूर करुन रुग्णाला चांगली दृष्टी देणे हाच या शस्त्रक्रिये मागचा उद्देश आहे.




**यासाठी साधारणपणे खर्च किती अपेक्षित असतो?**

डोळ्याच्या बुबुळाच्या पारदर्शक पडद्याच्या (कॉर्निया) सद्यस्थितीवर आणि शस्त्रक्रियेच्या प्रकारावर खर्च अवलंबून असतो. साधारणपणे

**₹ 50,000 – 1,50,000/-**

रुपये दरम्यान हा खर्च अपेक्षित आहे.



**ही शस्त्रक्रिया केल्यानंतर दृष्टी सुधारण्यास किती कालावधी लागतो?**

शस्त्रक्रिया झाल्यावर साधारणपणे ४८ तास रुग्णाच्या अधून मधून डोळ्यातून पाणी येत राहाते, डोळ्यात काही टोचल्यासारखे वाटते. यानंतर हळूहळू दृष्टी सुधारण्यास सुरुवात होते, पुढील ४८ तासात स्पष्ट दिसायला लागते, डोळ्यातून येणारे पाणीही थांबते. साधारण सहा ते आठ आठवड्यात दृष्टी पूर्ववत होते. अनेकांना एका डोळ्याने अधिक स्पष्ट आणि चांगले दिसत असल्यासारखे वाटते, पण यात काळजी करण्यासारखे, गंभीर काही नाही, हा बदल अपेक्षित आहे.

**लेझर शस्त्रक्रियेसाठी येताना मला उपवास करण्याची (फास्टिंग) करण्याची गरज आहे का?**

नाही. हॉस्पिटलमध्ये येण्यापूर्वी उपचारासाठी येण्यापूर्वी एक तास आधी तुम्ही खाऊन आलात तरी हरकत नाही.

**शस्त्रक्रियेनंतर काय काळजी घेणे अपेक्षित आहे?**

- एक आठवडा गॉगल किंवा काळा चष्मा (डार्क ग्लासेस) वापरणे आवश्यक
- डोक्यावरुन एक आठवडा आंघोळ करु नये
- डोळे जोर लावून पुसू नका तसेच चोळणे टाळावे
- पालथे किंवा एका कुशीवर झोपणे टाळावे
- लिहून दिलेल्या सूचनांनुसार ठरलेल्या वेळेत डोळ्यात ड्रॉप्स घालावेत
- शस्त्रक्रियेनंतर तीन महिने डोळ्यांना मेक-अप करु नये
- तीन महिने पोहणे टाळावे
- दोन आठवडे गाडी चालवू नये
- एक आठवड्यानंतर टप्याटप्प्याने स्मार्ट फोन आणि संगणकाचा वापर सुरु करावा



**उपचारानंतर माझ्या चष्म्याचा नंबर पूर्णपणे जाईल का?**

चष्म्यावरील अवलंबत्व कमी करणे हाच या उपचारपद्धतीचा मूळ उद्देश आहे. प्रामुख्याने रुग्ण चष्मा घालविण्यासाठीच येतात. काही अपवादात्मक केसेसमध्ये चष्म्याचा नंबर कमी होऊ शकतो अथवा वाढू शकतो. अशा वेळी पुन्हा एकदा उपचारपद्धती केली जाते अथवा चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्स दिल्या जातात. वयाच्या चाळीस वर्षानंतर वाचनासाठी स्वतंत्र चष्मा लागणे ही सामान्य बाब आहे.

**उपचारानंतर माझी दृष्टी सक्षम ( ६/६ व्हिजन) होईल का?**

आत्तापर्यंत अनेक रुग्णांसाठी ही उपचार पद्धती वापरण्यात आली असून साधारणपणे ९० ते ९५ टक्के रुग्णांची दृष्टी सक्षम (६/६ व्हिजन) झाल्याचा अनुभव आहे.